# उल्हासनगर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०७/१०/२०२३

# प्रेसनोट

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२१ पासून राबविण्याकरिता कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) प्रशासकीय अभियान व स्पर्धा २०२३-२०२४ मध्ये भाग घ्यावयाचा आहे.

त्याअन्वये उल्हासनगर महापालिकेतील सर्व विभागाअतंर्गत असलेल्या अभिलेख्यांचे निदंणीकरण / वर्गीकरण आणि सुयोग्य मांडणी करणेसाठी दिनांक ०४/१०/२०२३ रोजी सायंकाळी ५:०० वाजता सर्व अधिकारी/कर्मचारी यांची मार्गदर्शनपर बैठक आयोजीत करण्यात आली होती.

त्यास अनुसरून मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अजीज शेख यांच्या निर्देशानुसार अभिलेख्यांचे निदंणीकरण / वर्गीकरण आणि सुयोग्य मांडणी करण्यासाठी शनिवार दिनांक ०७/१०/२०२३ व रविवार, दिनांक ०८/१०/२०२३ रोजी महापालिकेचे कामकाज सुरु ठेवण्यात आले.

सदर अभियानात उल्हासनगर महापालिकेतील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी भाग घेऊन आपआपल्या कार्यालयांतील अस्थाव्यस्थ पडलेल्या फाईल्स, संचिका इत्यादी अभिलेखांचे निदंणीकरण / वर्गीकरण आणि सुयोग्य मांडणी करून पॅसेजमधील कपाटे काढून ते सुयोग्य ठिकाणी लावण्यात आली. सदर अभियानात सर्वच अधिकारी / कर्मचाऱ्यांनी सहभागी होऊन साफ-सफाई व अभिलेख्यांचे वर्गीकरण केल्याने महापालिका मुख्यालयातील सर्वच विभाग व मुख्यालयातील पॅसेज स्वच्छ व प्रसन्न झाल्याचे दिसून आले. सदर काम व्यवस्थित होते किंवा नाही याची प्रत्यक्ष पाहणी उप-आयुक्त श्री. अशोक नाईकवाडे यांनी केली.

तसेच याविषयी उप-आयुक्त श्री.अशोक नाईकवाडे यांनी दिनांक ०७/१०/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजता सर्व विभाग प्रमुखांसह पत्रकार कक्षात पत्रकार परिषद आयोजीत केली होती. सदर पत्रकार परिषदेमध्ये राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानांतर्गत महापालिकेच्या सर्व विभागांमार्फत होणारी साफ-सफाई, अभिलेखांचे निदंणीकरण / वर्गीकरण आणि सुयोग्य मांडणी, अभिलेखांचे व्यवस्थापन याबाबत उपस्थित पत्रकारांना थोडक्यात माहिती करून दिली.

(छाया प्रकाश डांगळे)<br>
जनसंपर्क अधिकारी<br>
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.<br>
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका<br>
प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका<br>
२) सिस्टीम ॲनालिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका<br>
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.